## विषयसूची

१. ग्रंथाचे संकलक आणि ज्ञानप्राप्तकर्ते यांचा परिचय ६

२. आध्यात्मिक परिभाषेतील वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावना ! ८

३. मनोगत ९

## ग्रंथाची अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)

१. देहाच्या विविध भागांवर असलेल्या केसांचे महत्त्व १२

२. केसांमुळे होणारे लाभ १९

३. पिंडशुद्धतेच्या प्रक्रियेत केसांच्या शुद्धीकरणाचे महत्त्व २२

४. प्राणी आणि मनुष्य यांचे केस २३

५. प्राणी, पुरुष आणि स्त्रिया यांचे केस २४

६. भारतीय आणि पाश्चात्त्य यांचे केस २५

७. केस वाढवणे २९

७ अ १. सर्वसाधारण पुरुषाने केस वाढवणे आणि साधूने केस वाढवणे २९

८. केस कापणे ३५

८ अ. पुरुषाने केस कापण्यामागील शास्त्र ३५

८ आ. स्त्रियांनी केस कापल्यामुळे होणारी हानी ३७

८ इ. स्त्रियांनी भुवया का कोरू नयेत ? ४५

८ ओ. नखे, केस, दाढी आणि मिशा का वाढू देऊ नयेत ? ५२

९. केसांशी संबंधित संस्कार आणि काही कृती ५५

९ इ २. तीर्थस्थळी जाऊन मुंडण करण्यामागील शास्त्र ५९

९ इ ४. कुटुंबीय मृत झाल्यास पुरुषांनी केस पूर्णपणे का कापावेत आणि स्त्रियांनी का कापू नयेत ? ६१

## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

- ग्रंथांतील ७० टक्के लिखाण हे अन्य संदर्भग्रंथांतील लिखाण, साधकांना सूक्ष्मातून मिळालेले ईश्वरी ज्ञान इत्यादी स्वरूपाचे आहे, तर ३० टक्के लिखाण ग्रंथांचे संकलक परात्पर गुरु डॉ. आठवले यांना गुरूंच्या आशीर्वादामुळे आतून स्फुरलेले आहे.
- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी 'का अन् कसे ?' यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना सहज समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी सांगणे) ज्ञान !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !
- साधनेविषयीचे तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !

## सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !

- मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे
- मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे
- ग्रंथांची संरचना 'इन्डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे

या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा –

(०८३२) २३१२३३४ किंवा grantgoa@gmail.com

## विषयसूचीतील क्रमांक ३

# मनोगत

पूर्वी स्त्रिया स्नानापूर्वी फणीघरासमोर बसून केस विंचरत असत, केसांची गुंतवळ चुलीत टाकत असत आणि केस मोकळे सोडून बाहेर जात नसत. आई किंवा आजी यांच्याकडून केसांसंबंधित अशा प्रकारचे संस्कार (आचार) सहजपणे मुलींवर होत असत. प्रत्येक मासात (महिन्यात) मुलालाही केस कापण्यासाठी नापिताकडे पाठवण्यात येई. स्नान झाल्यावर केसांना तेल लावायचा परिपाठही वडिलांकडून मुलाला शिकवला जाई. मधल्या काळात धर्मशिक्षणाच्या अभावी हिंदूंकडून धार्मिक आचार आणि परंपरा हळूहळू सोडून देणे किंवा त्यांविषयी अनास्था बाळगणे असे घडले. यातून सांस्कृतिक स्तरावर हिंदु समाजाची हानी झालीच; पण त्यापेक्षाही आध्यात्मिक हानी पुष्कळ झाली.

मानवी शरिरात निसर्गाने केलेली केसांची योजना केवळ सौंदर्यवर्धनासाठी नाही, तर केसांच्या माध्यमातून ईश्वरी चैतन्य ग्रहण करणे आणि जिवाची सात्त्विकता वाढवणे, यांसाठीही आहे. या ग्रंथात केसांच्या माध्यमातून ईश्वरी चैतन्य ग्रहण करून वाईट शक्तींच्या आक्रमणांपासून जिवाचे रक्षण कसे होते, याचेही शास्त्रीय विवेचन करण्यात आले आहे.

सध्या स्त्री-पुरुषांच्या केशभूषेकडे पहाण्याचा बहुतांश समाजाचा दृष्टीकोन केवळ सौंदर्यवर्धनाचा झाला आहे. येथेच धोक्याची घंटा वाजते. स्त्रीने केस कापणे, केस मोकळे ठेवून फिरणे यांसारख्या गोष्टी सौंदर्यवर्धनाच्या दृष्टीने जिवाला आवडल्या, तरी त्याद्वारे वाईट शक्तींच्या आक्रमणांना आमंत्रण देण्यासारखे आहे. केसांच्या संदर्भातील अशा अहितकारी कृती टाळून योग्य कृतींविषयी मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

स्त्री आणि पुरुष यांच्या शरिराचे अविभाज्य अंग असलेल्या केसांसंबंधी वाचकांना आध्यात्मिक दृष्टीकोन मिळून त्यांच्याकडून या ग्रंथात सांगण्यात आलेल्या आचारांचे पालन होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**